महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५१ वा | दिनांक : ०१/०८/२०२५ | वार : शुक्रवार

## मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी 'सत्यमेव जयते' असे म्हणत अंबादास दानवे यांनी केली पोस्ट



**छत्रपती संभाजीनगर** :मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व आरोपींना निर्दोष ठरवण्यात आले आहे. या निकालानंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या नेत्याची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. या संदर्भात 'सत्यमेव जयते' असे म्हणत विधान परिषदेतील विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणानंतर तत्कालीन काँग्रेस सरकारच्या वतीने 'हिंदू दहशतवाद' असा शब्दप्रयोग करण्यात आला होता. त्यामुळे देशात काँग्रेस विरुद्ध हिंदू समाजामध्ये संतापाची लाट पसरली होती. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांची एकत्र शिवसेना ही भाजपसोबत होती. या शब्दप्रयोगाचा विरोध त्या वेळी युतीच्या माध्यमातून करण्यात आला होता.

त्यानंतर आता या प्रकरणाचा सतरा वर्षानंतर निकाल समोर आला आहे. त्यातच उद्धव ठाकरे यांची शिवसेना सध्या काँग्रेस सोबत महाविकास आघाडीमध्ये आहे. असे असताना या प्रकरणाबाबत शिवसेनेची प्रतिक्रिया अद्याप समोर आली नव्हती. त्यात आता अंबादास दानवे यांनी सत्यमेव जयते म्हणत या प्रकरणावर सूचक प्रतिक्रिया दिली आहे.

आपल्या आणखी एका पोस्टमध्ये दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रत्युत्तर देखील दिले आहे. यामध्ये ते म्हणाले की, 'देवेंद्रजी, मुख्यमंत्री म्हणून आपला आदरच आहे. मात्र आपलं वक्तव्य नुकतंच ऐकलं. मालेगाव स्फोटातील आरोपी सुटले ही चांगली बाब आहेच. मात्र खरे सूत्रधार कोण याचा शोधही लागायला हवा, हे आपण बोलला नाहीत. थोडं इतिहासात डोकावलात तर कळेल, की या घटनेच्यानंतर आज सुटलेल्या लोकांना शिवसेनेनं काय सहकार्य केलं होतं ते. केलेले सहकार्य सांगायचे नसते, हीच आमची शिकवण आहे. तूर्त एवढंच!'

मालेगाव शहरातील २००८ मधील बॉम्बस्फोट प्रकरणात तब्बल १७ वर्षांनंतर आज (३१ जुलै) एनआयएच्या विशेष न्यायालयाकडून निकाल जाहीर होणार आहे. या स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला होता आणि १०० हून अधिक नागरिक जखमी झाले होते. खटल्यातील प्रमुख आरोपींमध्ये भाजप नेत्या आणि माजी खासदार साध्वी प्रज्ञा ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, तसेच आणखी पाच जणांचा समावेश होता. या सर्वांना आज निर्दोष सोडण्यात आले.


सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या प्रकरणी म्हणाले की, सतरा वर्षांच्या दीर्घ लढाईनंतर मालेगाव बॉम्बस्फोटातील सात कथित आरोपींची विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. न्यायाला उशीर झाला हे खरं आहे, पण सत्य कधीही पराजित होत नसतं, हे पुन्हा एकवार सिध्द झालंय.

मालेगावच्या स्फोटांप्रकरणी खोटे आरोप करुन तुरुंगात डांबण्यात आलेल्या देशभक्तांना शिवसेनेनं पहिल्यापासूनच निसंदिग्ध पाठिंबा दिला होता. कारण आपली बाजू न्यायाची आहे, याबद्दल शिवसेनेला कधीही संदेह नव्हता. कर्नल पुरोहित, साध्वी प्रज्ञा आदी सात जणांना या आरोपामुळे प्रचंड मानसिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागलाय.

हा अन्याय हिंदू जनता कधीही विसरणार नाही. हिंदू कधीही देशविरोधी कृत्यं करु शकत नाही, कारण देशभक्ती हे हिंदूधर्मीयांसाठी धर्मकार्यच असतं. 'हिंदू दहशतवाद' नावाचा भंपक शब्द काँग्रेसी षडयंत्रकारी नेत्यांनी चलनात आणला. याच्यासारखा धादांत त्यांच्यापाशी आता काय उत्तर आहे?

एक काळंकुट्ट पर्व आज संपलंय. हिंदू धर्मीयांवरचा कलंक पुसला गेलाय. 'गर्व से कहो हम हिंदू है' ही घोषणा आता शंभरपट मोठ्या आवाजात देशभर दुमदुमेल, यात शंका नाही. सत्य परेशान हो सकता है, पराजित नहीं! जय हिंद, जय महाराष्ट्र, असे शिंदे यांनी म्हटले आहे.

## काँग्रेसच्या नेत्यांनी हिंदूंची माफी मागावी : भाजप नेते किरीट सोमय्या



**छत्रपती संभाजीनगर** : २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व ७ आरोपींच्या निर्दोष सुटकेवर भाजप नेते किरीट सोमय्या म्हणाले की, "मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील न्यायालयाचा निकाल हा काँग्रेस आणि गांधी कुटुंबाच्या दोन्ही गालावर चपराक आहे. राजीव गांधी असोत, सोनिया गांधी असोत, राहुल गांधी असोत किंवा प्रियांका गांधी असोत. त्यांचा एकमेव अजेंडा हिंदूंना बदनाम करणे आणि मुस्लिमांना खुश करणे हा राहिला आहे. मुस्लिम मतपेढीला खूश करण्यासाठी काँग्रेसने पाकिस्तानी दहशतवाद्यांबद्दल सहानुभूतीही दाखवली आहे.

किरीट सोमय्या म्हणाले की "अनेक वर्षांपासून मुस्लिम मतपेढीला खूश करण्यासाठी हिंदूंना बाजूला ठेवण्यात आले. आता हे सिद्ध झाले आहे की हिंदू धर्म राष्ट्रवादावर विश्वास ठेवतो. 'भगवा आतंकवाद' असे काही नाही. २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व ७ आरोपींच्या निर्दोष सुटकेवर भाजप नेते किरीट सोमय्या म्हणाले, "मी न्यायव्यवस्थेचे आभार मानतो आणि चिदंबरम, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी देशातील हिंदूंची माफी मागावी, अशी मागणी देखील त्यांनी केली.

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सात आरोपींविरुद्ध सुनावणी एनआयए विशेष न्यायालयात सुरू होती. २९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगाव येथे झालेल्या भिक्खू चौक बॉम्बस्फोट प्रकरणाची सुनावणी मुंबईतील एनआयए विशेष सत्र न्यायालयात सुरू होती. मुख्य आरोपींमध्ये भाजपच्या माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर, मेजर (निवृत्त) रमेश उपाध्याय, लेफ्टनंट कर्नल श्रीकांत प्रसाद पुरोहित, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, लेफ्टनंट कर्नल पुरोहित आणि समीर कुलकर्णी हे आरोपी होते. या सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.




## हेमंत करकरे यांची हत्या झाली तेव्हाच निकाल लागला - जितेंद्र आव्हाड

**मुंबई** : मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी साध्वी प्रज्ञासिंह यांच्यासह इतर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. यानंतर ६५ किलो आरडीएक्स आले कुठून हा प्रश्न अनुत्तरित आहे. आतंकवादाला जात, धर्म, रंग, पंथ नसतो. तसेच आतंकवादाला धर्माचे नाव चिकटवणे योग्य नाही हे आधीपासून आम्ही सांगत आहोत, असे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, बिल्कीस बानो प्रकरणातील आरोपींना जेलमधून बाहेर काढण्यात आले, त्यांचा सत्कार करण्यात आला, पेढे वाटण्यात आले ही कायद्याची पायमल्ली होती. कोर्टाने निकाल दिलेला आहे यावर अधिक काही बोलणे योग्य राहणार नाही. परंतू, यात काँग्रेसचा काही संबंध नाही. मुंबईच्या लोकल बॉम्ब ब्लास्टमधले देखील आरोपी निर्दोष सुटले मग हे काय कुठल्या राजकीय पक्षांनी केले काय? असे आव्हाड म्हणाले.

पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, ज्या दिवशी हेमंत करकरे यांची हत्या झाली त्याच दिवशी या मालेगाव खटल्याचा निकाल लागला होता असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. बॉम्बब्लास्ट झाल्यापासून माझा प्रश्न आहे आरडीएक्स हे तीन-चार आतंकवादी संघटनांकडेच आहे. पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणांकडे मुबलक आरडीएक्स असते, असेही आव्हाड म्हणाले.


महादेव मुंडे प्रकरणाचा तपास नीट झालेला नाही हे पुराव्यानिशी सिद्ध होते. या खुना मागचा आका कोण होता आणि कुठल्या आकाने खून केला हे बीडकरांपासून काही लपून राहिलेले नाही. मला जी माहिती बीडमधून मिळते आहे, त्यानुसार एक महिला तयार होईल आणि ती सांगेल की महादेव मुंडेला तिनेच मारले याची संपूर्ण तयारी झालेली आहे. बघू आता ती महिला किती हिंमत दाखवते. त्या महिलेला पुढे केले जाईल आणि आकाला वाचवण्यासाठी हे केले जाईल, असाही दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १ ऑगस्ट २०२५


## महाकवी वामनदादांच्या हृदयाचं स्पंदन म्हणजेच शाहीर विजयानंद जाधव



**छत्रपती संभाजीनगर :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महपरिनिर्वाणाच्या काही वर्ष अगोदर मराठवाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद च्या माध्यमातून एका नव्या शैक्षणिक क्रांतीचा प्रारंभ मराठवाड्यात करून दिला . आणि खऱ्या अर्थाने मागास समजल्या जाणाऱ्या मराठवाड्याला एक समृद्धीचा ज्ञानमार्ग मिळाला. याच मिलिंदच्या समृद्ध अशा ज्ञानभूमीतून साहित्य, कला, शिक्षण, चळवळ, आंबेडकरी चिंतन आणि आंबेडकरी तत्वज्ञान या अशा विविध प्रांतात विलक्षण प्रतिभावंत माणसांची रेलचेल सुरु झाली...साहित्याच्या प्रांतात वेदना आणि विद्रोहाला अविष्कृत करत शंकरराव खरात, बाबुराव बागुल, कविश्रेष्ठ यशवंत मनोहर, डॉ. गंगाधर पानतावणे, दत्ता भगत, प्र. ई. सोनकांबळे, म.ना.वानखेडे , प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यासारख्या असंख्य कवी, लेखकांनी, साहित्यिकांनी अभिजात मराठी साहित्याला दलित साहित्याची जोड देऊन खऱ्या अर्थाने अभिजात मराठी साहित्य हे सर्वव्यापी आणि सर्वसमावेशक करण्यासाठी आपल्या वाणी आणि लेखणीने समृद्ध करण्याचा आतोनात प्रयत्न केला...याच दरम्यान महाकवी वामनदादा कर्डकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, आणि सामाजिक न्यायाच्या विचाराला आपल्या गीत आणि संगीताच्या माध्यमातून इथल्या शहरातल्या माणसांपासून ते खेडोपाडी आणि वस्तीतांड्यावर राहणाऱ्या माणसांपर्यंत पोहचवण्याचं महत्तम असा कार्य केलं. आणि खऱ्या अर्थाने आंबेडकरी सांस्कृतिक, सांगितीक आणि वैचारिक चळवळीला गतिमान असं स्वरूप प्राप्त झालं...अतिशय प्रतिकूल परिस्थिती असणारे वामनदादा पण आंबेडकरी आभा प्राप्त झाल्यामुळे प्रत्येकात एक गीतश्रीमंत आणि अप्रूप म्हणून वाटायला लागले....महाकवी वामनदादांच्या या गीत, संगीताच्या चळवळीत सावलीसारखं त्यांच्या सोबत जर कोण राहिलं असेल ते आपल्या औरंगाबाद चे दस्तूरखुद्द शाहीर विजयानंद जाधव.ज्यांना महाकवी वामनदादांनी मानसपुत्र मानलं...वामन परिघात केंद्रबिंदू म्हणून वावरत असताना विजयानंदांनी प्रज्ञा, शील आणि करुनेचा मार्ग स्वीकारत कायम वामनविचारांना अभिप्रेत असणारंच वर्तन केलं. आणि एक अतिशय प्रामाणिक, नितिमान आणि वामन इमान जपणारा शाहीर म्हणून संबंध मराठवाडा व महाराष्ट्रात एक लौकिक मिळवला...विजयानंदांची गाणी वाचत असताना किंवा त्यांच्या आवाजात जी काही गाणी ध्वनीमुद्रित झाली आहेत ती ऐकत असताना आपल्याला नकळत वामनदादांची एक छबी किंवा प्रतिबिंब उमटताना दिसतं...विजयानंदांनी भीमगीते तर गाईली आणि लिहिलीही त्यासोबत गझल, लावणी, भावगीते आणि लोकगीतेही लिहिली...त्या काळातील कृष्णधवल पडद्यावरील चित्रपटातही शाहीर विजयानंद यांची गीते पाहायला मिळतात...युगे येतील आणिक जातील जग येणारं पाहिल,भीम नावाचं तुफानी वादळ मागे असंच राहिल हे गीत असेल किंवा त्यांनी लिहिलेलं,शोधून पाहिले मी कोटी नरामधी,सामर्थ्य पाहिले मी आंबेडकरांमधी हे दोन गीतं ऐकत असताना शाहीर विजयानंद जाधवांच्या प्रतिभेची आणि गीत रचनेच्या शैलीची आपल्याला एक सर्वोत्तम अशी अनुभूती येते.आंबेडकरी चळवळीला दुहीचा शाप लागलेला आहे. ही चळवळ एकसंध राहावी या अर्थाने विजयानंद लिहितात,सत्तेसाठी तत्व भीमाचे पायी तुडवू नका,मातीमधल्या दगड खड्यांना उगाच चिडवू नका..अगदी साध्या पण तितक्याच अर्थगर्भ आशयाने ते गीताला प्रकट करताना दिसतात. नामांतराचा तो गौरवशाली आणि या देशाच्या चळवळीला एक नवं स्फुरन देणाऱ्या लढ्याला आणि एकूणच आंबेडकरी चळवळीचे किल्ले कसे मजबूत आहेत यावर भाष्य करताना त्यांनी इतकी उत्कट रचना केली आहे की, येणाऱ्या पिढ्यानं पिढ्या त्यांचं ते तुम्ही कितीही लावा शक्ती, तुम्ही कितीही लढवा युक्ती,तुम्ही करारे कितीही हल्ला,लय मजबूत भीमाचा किल्ला हे गाणं ऐकल्याशिवाय राहणार नाही.आज घडीला आंबेडकरी गीत संगीताच्या प्रांतात शाहीर विजयानंद जाधवांचं गाणं म्हणजेच त्या मैफिलीच्या गीत शृंखलेची अपरिहार्यता झालेली आहे...त्यांचा हा गीत संगीताचा वसा आणि वारसा त्यांचे कुटुंबिय अगदी धिरोदात्त पणे पुढं नेत आहेत. त्यांनी शाहीर विजयानंद जाधव प्रतिष्ठान स्थापन करून सातत्याने आंबेडकरी विचाराचा जागर करण्याचं काम ते करत आहेत.महाकवी वामनदादानी विजयानंदांचं बोट धरून त्यांना गाण्यापर्यंत आणलं.विजायानंदांनी त्यांच्या लहान मुलाला अर्थातच प्रख्यात गायक व संगीतकार प्रा. अमोल यांचं बोट धरून त्यांना गाण्यापर्यंत आणलं... आज अमोल हे आपल्या अतिशय माधुर्यसम्पन्न आणि रियाजाची एक बैठक असणाऱ्या आवाजाने त्यांच्या वडिलांच्या गाण्याचं बोट धरून आपल्यापर्यन्त वडिलांची गाणी पोहचवण्याचं काम करत आहेत... शाहीर विजयानंद जाधव यांच्या कुटुंबातीलच कालकथित बाबुराव जाधव , शाहीर गौतम जाधव, राहुल गौतम जाधव आणि शाहीर मेघानंद जाधव हे सुद्धा महाराष्ट्रातील अतिशय लोकप्रिय आणि विख्यात गीतकार गायक आणि संगीतकार म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत.ते केवळ आणि केवळ शाहीर विजयानंद जाधवाच्या संस्कार शिदोरीमूळे...आज शाहीर विजयानंद यांच्या स्मृती जागवण्याचं कारण हेच आहे की, आज त्यांचा विसावा स्मृतिदिन आहे.यानिमित्ताने आपल्या संभाजीनगर मधील यशवंतराव चव्हान नाट्यगृहात दिनांक 30 जुलै 2025 ला सायंकाळी ठीक 6 वाजता अतिशय भव्य दिव्य अशा शास्त्रोक्त आणि सुगम अशा भीमगीतांच्या मैफिलीचं खूप सुंदर असं संयोजन केलेलं असून महाराष्ट्रातील अनेक प्रसिद्ध असे गीतकार, गायक आणि संगीतकार विजायणंद जाधव यांनी गायिलेली व लिहिलेली गीते सादर करून त्यांना अभिवादन करणारं आहेत.माझी सर्व शहरवासीयांना आणि तमाम कलावंतांना विनंती आहे की, आपण या मैफिलीला यावं आणि महाकवी वामनदादांच्या लेखणीचा वारसा समृद्ध करणाऱ्या या शाहिराला अभिवादन करावं...

**लेखक शिंदे पंकज भास्करराव**
( लेखक ख्यातकीर्त निवेदक व जाणकार सांगितीक आस्वादक आहेत )

## कालिकादेवी विद्यालयात सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांना अभिवादन



**शिरूर (का.)** (30) जुलै शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'लोकनेते स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर' यांचा 'अठरावा स्मृतिदिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सन्माननीय प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने सर,पर्यवेक्षक जनार्दन काळे,सर यांच्या हस्ते,'स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर व लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून सांगितले की, 'स्व.नानांना व काकूंना गोरगरीब,दिन-दलित,कष्टकरी व शेतकरी,यांच्या विषयी खूप तळमळ होती.त्यांना जीवन जगण्यासाठी हाताला काम मिळाले पाहिजे,रोजगार मिळाला पाहिजे नोकरी मिळाली मिळाली पाहिजे. म्हणूनच त्यांनी शिक्षणसंस्था,साखर कारखाना,सहकारी बँका,इत्यादिंची उभारणी केली. त्यामुळे अनेक गरजूंना रोजगार व नोकरी मिळाली.जगण्याचं साधन उपलब्ध झालं.आज त्यांचे मुळेच आपण सन्मानाने जीवन जगत आहोत.म्हणूनच नाना-काकूंचे उपकार आपण कधीच विसरू शकणार नाहीत.असे वास्तव विचार भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून मांडले. यावेळी विज्ञान विभाग प्रमुख,प्रा.संजय काकडे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.अशोक इनकर,प्रा.प्रशांत मळेकर, प्रा. अनिल जरे, प्रा.संजय आव्हाड, प्रा. नारायण घोलप, प्रा .बिभिषण घायाळ, प्रा. महरूद्र डोंगरे, प्रा. विश्वास ढाकणे, प्रा.महादेव हांगे,प्रा.नारायण तांबे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.दत्ता शिंदे, डॉ. सत्यनारायण ढवळे, डॉ. अशोक घोडके, प्रा,अशोक सवासे, प्रा. सुनिल मोरे, प्रा. शशिकांत जावळे, प्रा. हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे,प्रा.अक्षय रणखांब,प्रा.अमर खोले, प्रा.सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम,आबासाहेब ढवळे,रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,वसंत आहेर,राजू बडे,जयेंद्र निकम,आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर,रोहित शिराळे,प्रशांत राऊत, रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे,अक्षय साळवे,जितेश उगलमुगले,आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर, विलास कांबळे,गौतम भोसले, इत्यादिंची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आत्माराम झिंजुर्डे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. विनोद गलांडे यांनी केले. विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १ ऑगस्ट २०२५


## लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे यांना फलक चित्राच्या माध्यमातून अभिवादन




**कन्नड (अरुण थोरात) :** तालुक्यातील नेवपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि. 1 ऑगस्ट रोजी होणाऱ्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर एक अत्यंत कलात्मक चित्रफलक साकारण्यात आला आहे.या चित्रफलकाचे वैशिष्ट्य म्हणजे फक्त रंगीत खडू आणि फळ्याचा वापर करून शाळेचे कला शिक्षक अमोल तागवाले यांनी दोन्ही थोर व्यक्तिमत्त्वांची सजीव आणि प्रभावी चित्रे रेखाटली आहेत. कोणतेही महागडे साहित्य न वापरता, अत्यंत कमी साधनसामग्रीतून त्यांनी हे कलाकृती साकारली आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरते.या चित्रफलकावर लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा तसेच त्यांचे प्रेरणादायी विचार लेखन केले असून, विद्यार्थ्यांमध्ये या चित्रफलकाविषयी विशेष आकर्षण आणि आदर दिसून येत आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंदांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कला, इतिहास आणि देशभक्तीचे एकत्रित शिक्षण मिळत आहे. अमोल तागवाले यांनी दाखवलेल्या कौशल्यामुळे नेवपूर शाळेच्या भिंतीवर केवळ चित्र नव्हे, तर प्रेरणेचा ठसा उमटलेला दिसतो.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर तीन वर्ष अत्याचार




**कळमनुरी :** तालुक्यात एका महिलेच्या असाहाय्यतेचा गैरफायदा घेत महिलेला लग्नाची आम्ही दाखवून अत्याचार करणाऱ्या तरुणाविरुद्ध कळमनुरी पोलिस ठाण्यात मंगळवारी ता २९ सायंकाळी गुन्हा दाखल झाला आहे. घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने तरुणाला ताब्यात घेतली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कळमनुरी तालुक्यातील गांगापूर येथील तरुण संजय बोक्से याने विदर्भातील एका महिलेसोबत ओळख वाढवली. आपण धाबा टाकणार असून त्या ठिकाणी कामाला ये असे संजय याने त्या महिलेस सांगितले. त्यानुसार ती महिला संजय यांच्या धाब्यावर काम करू लागली. यावेळी त्यांनी महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत तिच्याशी जवळीक वाढवली. त्यानंतर तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केला. सतत तीन वर्ष त्याने महिलेला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केले. यावेळी त्याने महिलेचे छायाचित्र देखील काढले.

दरम्यान त्या महिलेने लग्नाची मागणी केली असताना संजय यांनी लग्नाला नकार दिला तसेच छायाचित्र व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येतात त्या महिलेने आज सायंकाळी थेट कळमनुरी पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी संजय यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे

दरम्यान या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस उपाधीक्षक सुरेश दळवे, पोलिस निरीक्षक मोहन भोसले सहाय्यक पोलिस निरीक्षक रघुनाथ शेवाळे, जमादार गजानन होळकर यांच्या पथकाने तातडीने गावात जाऊन संजय यास ताब्यात घेतल्याचे पोलिसांनी सांगितले. उपाधीक्षक दळवे पुढील तपास करीत आहेत




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १ ऑगस्ट २०२५

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा धुळेकरांना संदेश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने खान्देश भूमी परिवर्तनशील झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा, त्यांच्या विचारांचा सहवास इथल्या कार्यकर्त्यांना, जनसामान्यांना मिळाला आहे. त्यांच्या विचाराने अनेक कार्यकर्ते घडले आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा आजही मोठ्या प्रमाणात इथले कार्यकर्ते जपताना, अंगीकारताना दिसत आहेत. ' भीम स्मृती यात्रा ' दिन म्हणून 31 जुलै हा दिवस धुळे येथे मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. या दिवशी विविध राज्यातून लाखो भीम अनुयायी लळींग किल्ला येथील ' लांडोर बंगला' या ठिकाणी डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी येतात. याच ठिकाणी या लांडोर बंगल्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्कामी होते. त्यांच्या या स्मृतींना उजाळा मिळावा म्हणून या ठिकाणी महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश व इतर अनेक ठिकाणाहून लाखो भीम अनुयायी येत असतात.31 जुलै 1937 साली धुळे या ठिकाणी कोर्टाच्या कामानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले होते. शिरपूर तालुक्यातील वाघाडी येथील जहागीरदार हुलेसिंग मोतीराम पाटील आणि मगन वाणी आणि इतर सोळा जण यांच्यात बैल पोळ्याच्या मिरवणुकीत आपले बैल पुढे ठेवण्यासाठीच्या अर्जावरून वाद होता. जहागीरदार यांनी तो अर्ज जिल्हाधिकारी तथा जिल्हा न्यायदंडाधिकारी( ए.एच.डॅकप ) यांच्याकडे केला होता. या अर्जाच्या सुनावणीसाठी अॅड.तवर आणि अॅड. मुळे या वकिलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धुळे येथे आमंत्रित केले होते. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अभ्यासपूर्ण केस चालवून, युक्तिवाद करून जहागीरदार पाटील यांना अनुकूल असा न्याय मिळवून दिला होता.भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे धुळे जिल्ह्यात फक्त दोन वेळा आले होते. त्यांनी विजयानंद थिएटर आणि म्यु.शाळा न.5 येथील भव्य आवारात जनतेला मार्गदर्शन केले होते. पहिल्यांदा ते 31 जुलै 1937 साली व त्यानंतर ते 17 जून 1938 ला धुळे दौऱ्यावर आले होते. 31 जुलै 1937 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोर्टाच्या कामानिमित्त धुळे या ठिकाणी सकाळीच स्टेशनवर येणार ही माहिती धुळेकरांमध्ये ज्यावेळी पोहोचली त्यावेळी धुळे स्टेशन हे स्त्री-पुरुषांच्या व मुलांच्याही गर्दीने फुलून गेले होते. स्टेशनवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जयघोष मोठमोठ्यांनी होत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वागतासाठी ए.आर. सावंत, पुनाजीराव लळिंगकर, तुकारामजी पहिलवान,ठेंगे,जी.एस.
आहिरे,आर.बी.अहिरे, सुखदेव पहिलवान, धोंडीराम पहिलवान, सखाराम पहिलवान, देवरामपंत अहिरे, कॅप्टन भीमराव साळुंखे व इतर मंडळी प्रामुख्याने हजर होती. सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर धुळे स्टेशनवर 8:20 वाजता पोहोचले. त्यावेळी ' आंबेडकर कौन है! दलितों का राजा है! आंबेडकर जिंदाबाद!अशा घोषणा दिल्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गळयात हार घालून स्वागत करण्यात आले.त्यानंतर ट्रॅव्हलर्स बँगलोपर्यंत (संदेश भूमी)भि. पाटील वकील यांच्या मोटारीतून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी धुळ्यातील व वेगवेगळ्या बाहेरगावाहून आलेल्या स्त्री-पुरुष व मुलांचा अफाट जनसमुदाय जमला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दर्शन घेतल्याशिवाय ही मंडळी तेथून हालत नव्हती. शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बंगल्या बाहेर आले व त्यांनी त्या मंडळींना सांगितले की, माझे आता कोर्टाचे काम आहे ते संपल्यानंतर आपण मला ज्या ठिकाणी बोलवाल त्या ठिकाणी मी येईन असे सांगून त्या सर्व मंडळींना जाण्यास सांगितले. कोर्टाचे काम दुपारी संपल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर बर्वे पाटील यांच्या घरी गेले व नंतर राजेंद्र छात्रालय व चोखामेळा बोर्डिंगला भेट दिली तिथे त्यांचे स्वागत करण्यात आले व नंतर ठरल्याप्रमाणे धुळे येथील विजयानंद थिएटरमध्ये डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण ठेवण्यात आले होते. ते थिएटर प्रचंड मोठ्या अफाट जनसमुदायाने दुमदुमून गेले होते. कित्येकांना जागा मिळाली नव्हती. अनेकांना थिएटरच्या बाहेर उभे राहून ऐकावे लागले. डॉ . बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की,संघटना करणे तुमचे कर्तव्य आहे. कारण संघटना न केल्यास तुमची दैना शतपट होईल . इंग्रज जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांच्या मनात जातीविषयक भावना व स्पृश्यास्पृश्य असा भेदाभेद नव्हता. पण आता मात्र ते गेले तरी हे लोक कायम राहणार आहेत. त्यांनी जर जुलूम केला तर आपल्याला पाटील, शिपाई,मामलेदार कोणीही मदत करत नाही. अगदी तीच परिस्थिती आज दिसत आहे. इथली मंडळी मोठ्या प्रमाणावर नानाविध क्षेत्रात अन्याय अत्याचार करताना दिसतात. आपल्या संघटनाही विखुरलेल्या दिसतात. त्यामुळे त्याकाळी बाबासाहेब आंबेडकरांनी संघटना मजबूत करण्याचा दिलेला सल्ला आजही महत्त्वाचा आणि मोलाचा वाटतो आहे. त्याचबरोबर बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, मला अनेक जण म्हणतात की तुम्ही अस्पृश्याकरिता जी चळवळ करतात ती बंद करा.पण मी पैशासाठी किंवा मानपानासाठी हे करत नाही.तुम्ही स्वाभिमानी बनावे हीच माझी आकांक्षा आहे व त्याकरिताच स्वतंत्र चळवळ करणे मला अवश्य आहे. कारण मला तुमच्या पेक्षा थोडे जास्त ज्ञान आहे. हा विचार आजच्या काळातही ज्यांच्याकडे ज्ञान,पैसा आहे त्या लोकांना आत्मपरीक्षण करायला लावणाराआहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, स्वार्थी दुर्गुणी लोक खूप मोठ्या प्रमाणावर निर्माण होतील त्यांना दळणाच्या खड्यावाणी बाजूला फेका, राजकारणात ऐक्य संघटना जितकी जास्त तितकी लवकर प्रगती होते, मागून खाऊ नका, चांगले अन्न खा, जेणेकरून लोक तुम्हाला मान देतील, स्वच्छतेने रहा नीटनीटके रहा, न्याय इभ्रतीने कामे करा, स्त्रियांनीही आपले वर्तन सुधारून आपल्या पोटी मामलेदार, जज मुले जन्माला येतील यासाठी प्रयत्न करावे. स्वाभिमानाने व धैर्याने वागायला शिका. आपल्या अंतिम ध्येय गाठण्यासाठी कसोशीने प्रयत्न करा. हाच संदेश खान्देशातील आणि इतर ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी आपल्या अंगी बाळगला अन् चोहीकडे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो आहे. आज जो काही बदल झालेला दिसतो तो केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळेच.

**प्रा. डॉ. सतीश मस्के**
पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे
मो.9423397484

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact : 9405109103
8830838903

# मुन्शी प्रेमचंद जयंती उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर:** मुन्शी प्रेमचंद जयंती निमित्ताने डॉ. सौ इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विचारपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई, डॉ राम दूधमांडे, डॉ. शोभा हनवते, प्रा. पुजा मुठ्ठे, प्रा. सुचित्रा कुलकर्णी यांची उपस्थिती होती.प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई प्रेमचंद जयंती निमित्ताने सर्वांना शुभेच्छा संदेश देत प्रेमचंदजी का साहित्य कालजयी है। प्रेमचंद के ही शब्दों में कहा जाय तो "सुख भोगने की लालसा आत्मसम्मान का सर्वनाश कर देती है।" सर्व विद्यार्थ्यांनी प्रेमचंद हिंदी भाषेतील महत्वपूर्ण साहित्यिक आहेत. त्यांचे साहित्य वाचले की तुम्हाला एक दिशा मिळेल. हिंदी विभाग प्रमुख डॉ. रमा दूधमांडे विद्यार्थ्यांना संबोधित करतांना म्हणाल्या की, प्रेमचंदजीचे साहित्य वाचण्याची गरज आहे , त्यातून तुमची घडवणूक होईल असे प्रोत्साहन आपले मनोगत व्यक्त केले. आजच्या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्ते कनिष्ठ महाविद्यालयाचया प्रा. डॉ.शोभा हनवतेजी ने प्रेमचंदजी के विषय में अपने विचार व्यक्त करते हुए कहा की, प्रेमचंद का लेखकीय व्यक्तित्त्व और निजी व्यक्तित्व एक दूसरे से अलग नहीं किया जा सकता, वे एकदूसरे में खपकर उनकी रचनाओं में उभरते है। वे अपने आप को एक मजदूर समझते है और कहते है "जिस दिन कुछ न लिखूँ उस दिन मुझे रोटी खाने का अधिकार नही।" प्रेमचंद की कहानी बडे घर की बेटी का संदर्भ देते हुए सम्मिलीत कुटुंब का समर्थन किया। आपल्या भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेमचंदजीचे व्यक्तित्व आणि कृतित्वाचा परिचय करुन दिला. प्रा.पूजा मुठ्ठे यांनीही आपले विचार व्यक्त केले. त्यांनी प्रेमचंदजीच्या साहित्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक सुचित्रा कुलकर्णी यांनी केले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १ ऑगस्ट २०२५

# सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे



01 ऑगस्ट हा महाराष्ट्राच्या आणि भारताच्या सामाजिक-साहित्यिक इतिहासात एका महान लोकनायकाचा जन्मोत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. ते नाव म्हणजे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे. भारतीय समाजातील सामाजिक विषमता, जातीय शोषण, आर्थिक अन्याय, अशिक्षितपणा, भूक, कामगार शोषण आणि उपेक्षित समाजाच्या अस्तित्वासाठी लढणारा एक शब्द योद्धा म्हणजे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे होते. 01 ऑगस्ट हा केवळ त्यांच्या जन्मदिनाचा स्मरणदिवस नाही, तर तो सामाजिक परिवर्तनाच्या एका सशक्त प्रवाहाच्या आरंभाचा दिवस आहे. अण्णा भाऊ साठे हे केवळ लेखक नव्हते, ते क्रांतीचे अग्रदूत होते. त्यांनी साहित्याच्या आणि लोककलेच्या माध्यमातून वंचितांना स्वर दिला, त्यांच्या वेदनांना अर्थ दिला आणि त्यांच्या हक्कांसाठी लढण्याचे बळ दिले. त्यांचे साहित्य, त्यांची शाहिरी, त्यांची वैचारिक भूमिका आणि त्यांचे सामाजिक योगदान हे आजही सामाजिक क्रांतीच्या प्रेरणादायी गाथा आहेत.

अण्णा भाऊ साठे, ज्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे, ते केवळ एक साहित्यिक नव्हते; ते एक क्रांतीकारी विचारवंत, लोककलावंत, समाजसुधारक आणि कष्टकऱ्यांच्या हक्कांसाठी लढणारे झुंजार नेते होते. त्यांच्या साहित्यातून आणि कार्यातून त्यांनी समाजातील वंचितांना, उपेक्षितांना आणि शोषितांना एक नवी वाचा दिली. त्यांचे जीवन म्हणजे गरिबी, संघर्ष आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे एक प्रेरणादायी उदाहरण असून, जे आजही समाजाला दिशा देत आहे.

01 ऑगस्ट 1920 मध्ये सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे मातंग जातीत जन्मलेल्या अण्णा भाऊ साठे यांनी लहानपणापासूनच सामाजिक अन्यायाचे चटके सोसले होते. जातिभेद, दारिद्र्य, अपमान आणि शिक्षणापासून वंचित ठेवले जाणे हे त्यांच्या जीवनाचे पहिले धडे होते. शाळेत दीड दिवस बसल्यावरही भारतामध्ये आणि त्यातल्यात्यात महाराष्ट्रामध्ये असलेल्या जातीवर आधारीत विषमतेमुळे त्यांनी शाळा सोडली. पण शिक्षण बंद झाले, म्हणून त्यांनी शिकणे थांबवले नाही. “रस्ता हेच माझे विद्यापीठ” असे ते म्हणत असत. ते अनुभवांमधून, समाजातील व्यवहारातून, आणि लोकांच्या आयुष्यातून शिकले. भारतीय आणि महाराष्ट्रीयन समाजातील या जीवनशाळेने त्यांना समतेचे, लढ्याचे आणि परिवर्तनाचे खरे शिक्षण दिले. त्यांच्या लेखणीमागे दडलेली विद्रोहाची, आत्मसन्मानाची आणि न्यायासाठी उभं राहणाऱ्या माणसाची जाणीव होती.

मुंबईत आल्यानंतर त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. या काळात त्यांनी कामगारांचे शोषण, त्यांचे दुःख, त्यांच्या व्यथा आणि त्यांच्या जगण्याचा संघर्ष जवळून पाहिला व अनुभवला. स्वतः कष्टकरी असल्याने त्यांना कामगारांच्या भावना आणि त्यांच्या अडचणींची खोलवर जाणीव होती. याच अनुभवांतून त्यांच्यातील कलावंत जागा झाला. त्यांनी पोवाडे, लावण्या, कथा, कादंबऱ्या आणि नाटके लिहायला सुरुवात केली. त्यांच्या साहित्यातून त्यांनी कामगार, दलित आणि ग्रामीण भागातील उपेक्षित लोकांचे जीवन, त्यांच्या आशा-आकांक्षा आणि त्यांचे दुःख प्रभावीपणे मांडले. त्यांनी आपली लेखणी समाज परिवर्तनाचे एक शक्तिशाली साधन बनवले होते.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची खरी ताकद ही त्यांच्या ज्वलंत आणि वास्तववादी चित्रणामध्ये होती. त्यांच्या लेखणीला क्रांतीची धार होती. त्यांनी अनेक कादंबऱ्या, कथा, पोवाडे, लावण्या, वगनाट्ये आणि लोकनाट्यांची निर्मिती केली. त्यांची प्रसिद्ध कादंबरी 'फकिरा' ही एका दलित युवकाच्या सामाजिक विद्रोहाची कथा असून, ती त्यांच्या तळागाळातील जीवनावरील प्रगल्भ निरीक्षणाची साक्ष देते. 'फकिरा' ही कादंबरी केवळ एका पात्राची कथा नाही, तर एका वर्गाच्या आत्मभानाची आणि अन्यायाविरोधातील संघर्षाची कहाणी आहे. 'फकिरा' मधून त्यांनी ब्रिटिशांविरुद्धच्या एका मातंग समाजातील नायकाच्या, फकिराच्या संघर्षाचे प्रभावी चित्रण केले आहे. फकिराचे शौर्य, त्याचा अन्यायाविरुद्धचा लढा आणि त्याच्या समाजाचे दुःख यातून स्पष्टपणे समोर येते.

अण्णा भाऊ साठे यांनी सामाजिक क्रांतीचा पाया आपल्या साहित्याने आणि शाहिरीने रचला आहे. त्यांचं लेखन केवळ भावना व्यक्त करणारे नव्हते, तर ते सामाजिक परिवर्तनासाठी प्रेरणा देणारे होते. त्यांनी त्यांच्या साहित्याद्वारे समाजप्रबोधन केले आहे. लोककला ही केवळ करमणुकीची बाब नसून ती समाज बदलण्याचे प्रभावी माध्यम असू शकते, हे त्यांनी बोलून नाही तर करून दाखवले आहे. त्यांची “माझी मैना गावाकडं राहिली” ही छक्कड-लावणी फक्त एक विरहगीत नाही तर, ती मुंबईतील कष्टकरी कामगाराच्या जीवनाची वेदना आहे. त्यांच्या पोवाड्यांमध्ये एका वर्गाच्या इतिहासाची धग आहे. त्यांच्या वगनाट्यांतून सामाजिक विसंगतींवर प्रहार आणि जागृतीचे अभंग ऐकायला मिळतात.

अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक क्रांतीचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी उपेक्षित समाजाला आत्मभान दिलं आहे. त्यांनी दलित, भटके-विमुक्त, स्त्रिया, आदिवासी, कष्टकरी, शेतमजूर या सर्व वंचित घटकांच्या दुःखांना केंद्रस्थानी ठेवून लेखन केलं आहे. पण त्यांचं लेखन फक्त वेदनांचं नव्हतं तर ते लढ्याचं, बदलाचं आणि भविष्याकडं पाहण्याचं होतं. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून आणि लोककलांमधून एक विचार पुढे आला तो म्हणजे अन्यायाविरुद्ध उठाव करणे होय. त्यांच्या मते अन्यायाविरुद्ध उठाव करणे पाप नसून कर्तव्य आहे. त्यांनी उपेक्षित समाजाला 'भिकाऱ्याची' नव्हे, तर 'लढवय्याची' ओळख दिली. हा बदल फक्त साहित्यिक नाही, तर सामाजिक क्रांतीसाठी निर्णायक ठरलेला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन अण्णा भाऊ साठे यांनी दलित चळवळीत सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांनी सामाजिक समतेचा विचार लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी लेखन आणि लोककलेचा वापर केला. “जग बदल घालूनी घाव, सांगुनी गेले मज भीमराव” या त्यांच्या गीतामधील ओळींमधून त्यांच्यावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. पण त्यांनी केवळ दलित नव्हे, तर सर्व वंचित वर्गासाठी संघर्ष केला आहे. त्यांना केवळ सामाजिक समतेचा पुरस्कार करायचा नव्हता, तर ती समता व्यवहारात आणायची होती. म्हणूनच त्यांचं लेखन हे कृतीशील आहे, आणि त्यांच्या विचारांची जडणघडण ही मैदानावर झालेली आहे.

अण्णा भाऊ साठे हे मार्क्सवादी विचारधारेनेही प्रभावित होते. त्यांनी श्रमिक वर्गाच्या संघटनेवर आणि वर्गसंघर्षावर भर दिला. कष्टकऱ्याच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळावी, त्याच्या घामाला किंमत मिळावी, यासाठी ते झगडले. “पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर नाही, तर कष्टकऱ्याच्या तळहातावर तरलेली आहे,” हे त्यांचं विधान आजही एका क्रांतीच्या घोषणेइतकंच प्रभावी आहे. त्यांनी कामगार चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या साहित्य आणि शाहिरीतून कामगारांच्या जीवनातील प्रत्यक्ष वास्तव, त्यांच्या स्वप्नांची उभारणी आणि त्यांच्या व्यथांची धार समोर आली आहे. अण्णा भाऊंच्या लेखनात भावनात्मक आशय असूनही त्यात समाजवास्तवाशी भिडण्याचं बळ आहे.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ असो, गोवा मुक्ती संग्राम असो, की मजूर संघटनांच्या आंदोलनाची वेळ असो, अण्णा भाऊ साठे हे प्रत्येक ठिकाणी जनतेच्या आवाजाचे प्रतिनिधी बनून पुढे आले होते. त्यांच्या शाहिरीने लोकांना चेतना दिली, प्रोत्साहन दिलं. त्यांनी आंदोलनं, सभांना आपलं सर्जनशील योगदान दिलं. त्यांच्या पोवाड्यांनी लोकांच्या मनात अस्मितेची ज्योत पेटवली. अण्णा भाऊंनी समाजप्रबोधनाला शब्द दिला, आणि त्या शब्दांना योग्य स्वरात बांधून जनतेपर्यंत नेलं.

अण्णा भाऊ साठे यांचं कार्य केवळ महाराष्ट्रापुरतं सीमित राहिलं नाही. त्यांच्या साहित्याचं रशियन भाषांमध्ये भाषांतर झालं. ते रशियात साहित्य संमेलनासाठी गेले होते. मॉस्कोमध्ये त्यांचा अर्धपुतळा उभारण्यात आला आहे. हे त्यांच्या कार्याच्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाचं प्रतीक आहे. ते एका ग्रामीण, अस्पृश्य समाजात जन्मलेले माणूस होते, पण त्यांच्या विचारांनी आंतरराष्ट्रीय साहित्यविश्वाला प्रभावित केलं आहे. आज त्यांच्या साहित्याचा अभ्यास केवळ दलित किंवा प्रक्षोभक साहित्य म्हणून नाही, तर एक प्रभावी समाजचळवळ म्हणून केला जातो.

आज जेव्हा समाजात पुन्हा जातीय द्वेष, विषमता, आर्थिक दरी, स्त्रियांचे शोषण, शिक्षणाची वानवा, आणि नव्या स्वरूपात कामगारांचे शोषण दिसते, तेव्हा अण्णा भाऊ साठे यांची आठवण अनिवार्य ठरते. त्यांच्या विचारांची, त्यांच्या लेखणीची आणि त्यांच्या प्रबोधनाची आजच्या काळातही तितकीच आवश्यकता आहे. नव्या पिढीने त्यांच्या साहित्याचा परिचय करून घेतला पाहिजे. त्यांच्या आयुष्याचा अभ्यास, त्यांच्या लेखनातील संदेश, आणि त्यांच्या लोककलांची परंपरा नव्याने उर्जित झाली पाहिजे.

01 ऑगस्ट हा दिवस त्यांच्या स्मृतीला वंदन करण्याचा आहे, पण तो त्यांच्या विचारांना कृतीत उतरवण्याचाही दिवस आहे. त्यांच्या स्मृतीला खरं तर पुष्पहार नव्हे, तर कृतीतून जागवलेलं सामाजिक समतेचं बीज हेच योग्य अभिवादन ठरेल. त्यांनी दाखवलेल्या लढ्याच्या मार्गावर चालणं, त्यांचं लेखन नव्या भाषेत जनतेसमोर आणणं, आणि त्यांच्या स्वप्नातील समतेचा समाज घडवण्याचा संकल्प करणे हेच 'सामाजिक क्रांतीच्या अग्रदूता'ला योग्य अभिवादन ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
नाशिक (लेखक, सहायक प्राध्यापक असून समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत.)
ईमेल — bagate.rajendra४@gmail.com
मो. क्र.- 9960103582

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002